**RASHTRASANT TUKADOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY**

"(Established by Government of Central Provinces Education Department by Notification No. 513 dated the 1st of August, 1923 & presently a State University governed by Maharashtra Universities Act, 1994.)"

**Office of the Controller of Examinations**
**(Ph.D. Cell)**
**Examination Bhawan, Laxminarayan Institute of Technology Premises,**
**Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University,Nagpur-440033**

No. RTMNU/Ph.D. Cell./Ph.D. Registration-2016/ 2053 Dated : 15 · 11 · 2016

# आचार्य पदवीसाठी नोंदणीकरिता परिपत्रक

विषय: आचार्य पदवीसाठी नोंदणी करण्याकरिता आवेदनपत्र सादर करण्यासंबंधी अवलंबिण्यात येणा–या प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती

अ) विद्यार्थ्याकरिता सुचना :

१) निर्देश कमांक १/२०१६ मधील तरतूदीनुसार आचार्य नोंदणी करणा–या विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांनी आचार्य पदवी प्रवेश परीक्षा (Ph.D. Entrance Test-I and II) उत्तीर्ण केलेली आहे अशा सर्व विद्यार्थ्यासाठी दिनांक १ डिसेंबर २०१६ ते १५ जानेवारी २०१७ पर्यत **www.nagpuruniversity.org** या संकेतस्थळावर **Ph.D. Registration** या नावे सुरू करण्यात आलेल्या उप–संकेत स्थळावर ऑनलाईन आवेदनपत्र उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

२) मा. उच्च न्यायालयानी दिलेल्या आदेशानुसार ज्या विद्यार्थ्यांनी निर्देश कमांक २९/२०१२ मधील तरतूदीनुसार आचार्य पदवी नोदणी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण केलेली असून ज्याची प्रवेश परीक्षेची वैधता ६० महिन्याची नमूद करण्यात आलेली होती अश्या विद्यार्थीना सुध्दा उपरोक्त सुचनेनुसार ऑनलाईन आवेदनपत्र सादर करता येईल. परंतु आचार्य पदवी नोंदणी तसेच पुढील प्रकिया निर्देश कमांक १/२०१६ मधील तरतूदीनुसार किंवा यांसदर्भात वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या किंवा येणा–या निर्देशामधील तरतूदीनुसार होईल.

३) मार्गदर्शक पदव्युत्तर शिक्षक मान्यताप्राप्त असणे आवश्यक असून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सुचनेनुसार मार्गदर्शक संबधित संशोधनस्थळात कार्यरत असणे आवश्यक आहे.

४) मार्गदर्शक आणि संशोधन स्थळ वेगवेगळे राहणार नाही. वेगळया महाविद्यालयात कार्यरत मार्गदर्शकामार्फत वेगळया संशोधन स्थळाकडून प्राप्त आवेदन कोणतीही सुचना न देता आपोआप रद्द करण्यात येईल.

५) आचार्य पदवी नोंदणीकरिता आवेदन करण्यासाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने आचार्य पदवी नोंदणीसाठी ऑनलाईन आवेदनपत्र सादर करून त्या आवेदनपत्राची प्रिंट कॉपी खालील आवश्यक कागदपत्रासह आचार्य पदवी कक्ष, परीक्षा भवन, लक्ष्मीनारायण तांत्रिक संस्था परिसर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, अमरावती रोड, नागपूर येथे दिनांक २० जानेवारी २०१७ पर्यंत जमा करावयाची आहेत. दिनांक २० जानेवारी २०१७ नंतर आचार्य पदवी नोंदणी आवेदन स्वीकृत करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

ब) आवेदनपत्रासोबत संलग्न करावयाचे कागदपत्रे:

आवेदन पत्रासोबत खालील कागदपत्रे संलग्न करणे बंधनकारक आहे. अपूर्ण आवेदनपत्र आपोआप रद्द करण्यात येईल व अपूर्ण आवेदनकर्त्या विद्यार्थ्यांना संशोधन व मान्यता समितीसमोर सादरीकरणासाठी बोलविण्यात येणार नाही.

१) A copy of On Line Ph.D Registration Application Form with signature of Head, Place of Research and Signature of allotted guide by Place of Research.

२) आचार्य पदवी नोंदणी शुल्क रू. १०००/– ची पावती (आचार्य नोंदणी शुल्क लेखा विभाग, महात्मा ज्योतीबा फुले शैक्षणिक विद्यापीठ परिसर, अमरावती रोड, नागपूर येथे भरावयाचे आहे)

३) पेट–१ आणि पेट–२ उत्तीर्ण प्रमाणपत्राची सत्यप्रत

४) (मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ६० महिन्याची वैधता असलेल्या पेट परीक्षा उत्तीर्ण करण्यात आलेल्या प्रमाणपत्राची सत्यप्रत. (निर्देश क्रमांक २९/२०१२ मधील तरतूदीनुसार)

५) पदवी आणि पदव्युत्तर परीक्षेची गुणपत्रिकेची सत्यप्रत (पदव्युत्तर परीक्षेत खुल्या प्रवर्गाकरिता ५५ टक्के आणि राखीव प्रवर्गाकरिता ५० टक्के गुण असणे आवश्यक आहे.) (मा. उच्च न्यायालयानी दिलेल्या आदेशानुसार निर्देश क्रमांक २९/२०१२ मधील तरतूदीनुसार आचार्य पदवी नोंदणी प्रवेश परिक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी नमूद शैक्षणिक पात्रतेच्या अटीनुसार)

६) ज्या विद्यार्थ्यांची पदव्युत्तर गुणपत्रिका राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची नसेल अश्या प्रकरणामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाकडून पात्रता प्रमाणपत्र घेवून आवेदनपत्रासोबत मुळ पात्रता प्रमाणपत्र संलग्न करणे आवश्यक आहे.

७) ज्या विद्यार्थ्यांची पदव्युत्तर गुणपत्रिका राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची नसेल अश्या प्रकरणामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ परीक्षेत्रात राहण्याबाबत Executive Magistrate च्या स्वाक्षरीचे रहिवासी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

८) संशोधन आराखडयाची ७ प्रती

९) संशोधन स्थळ मान्यतेची सत्यप्रत(राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे पदव्युत्तर शैक्षणिक विभाग वगळून)

१०) संशोधन स्थळामध्ये प्रवेशित संशोधकांची यादी व रिक्त असलेल्या जागांची संख्येची माहिती

११) मार्गदर्शकाकडे संशोधन करीत असलेल्या संशोधकांची यादी

१२) मार्गदर्शक पदव्युत्तर शिक्षक मान्यताप्राप्त असल्याची सत्यप्रत

१३) मार्गदर्शक विद्यापीठ मान्यताप्राप्त प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/सहायक प्राध्यापक असल्याबाबतचे पत्राची प्रत

१४) मार्गदर्शक मान्यतेचे सत्यप्रत

१५) विद्यार्थीनीबाबत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाकडून निर्गमित नांव बदल अधिसूचनेची सत्यप्रत

क) <u>संशोधन स्थळाकरिता आवश्यक सुचना</u> :

१) संबधित महाविद्यालयांना ज्या विषयात संशोधन स्थळ म्हणून मान्यता मिळालेली आहे त्या विषयाचे मार्गदर्शक संबधित महाविद्यालयात कार्यरत असणे आवश्यक असून ते पदव्युत्तर शिक्षक मान्यताप्राप्त असणे आवश्यक आहे.

२) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिशानिर्देशानुसार प्राध्यापकांना—८, सहयोगी प्राध्यापकांना—६ आणि सहायक प्राध्यापकांना —०४ पेक्षा जास्त संशोधक विद्यार्थी घेता येणार नाही.

३) संशोधन स्थळामध्ये विषयनिहाय प्रवेशित विद्यार्थ्यांची व रिक्त जागांची माहिती महाविद्यालयांच्या सुचना फलकावर प्रकाशित करणे आवश्यक आहे.

४) विषयनिहाय पदव्युत्तर शिक्षक मान्यता असलेल्या मार्गदर्शकाची, त्यांच्याकडे संशोधन करीत असलेल्या विद्यार्थ्यांची यादी व रिक्त जागांची माहिती महाविद्यालयांच्या सुचनाफलकावर प्रकाशित करणे आवश्यक आहे.

५) संशोधन स्थळ आणि मार्गदर्शकाकडे रिक्त असलेल्या जागांच्या आधारावर आचार्य नोंदणी प्रवेश परीक्षा पेट—१ आणि पेट—२ उत्तीर्ण विद्यार्थी तसेच मा. उच्च न्यायालयांनी दिलेल्या आदेशानुसार निर्देश क्रमांक २९/२०१२ मधील तरतूदीनुसार ज्या संशोधकांनी पेट परीक्षा उत्तीर्ण केलेल्या विद्यार्थ्यांसह संशोधनस्थळामध्ये संशोधन स्थळ प्रमुखांच्या नावे आवेदन करतील.

६) संशोधन स्थळ प्रमुख आणि संबधित विषयाचे मार्गदर्शक यांची समिती प्राप्त झालेल्या सर्व आवेदनावर विचार करून विद्यार्थ्यांची मुलाखत घेवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शक नेमूण देतील. मार्गदर्शक नेमतांना आरक्षण नियमाचे तंतोतंत पालन करण्यात यावेत.

७) उपरोक्त कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर दिनांक १ डिसेंबर २०१६ ते १५ जानेवारी २०१७ या कालावधीत विद्यार्थी आचार्य नोंदणी ऑनलाईन आवेदन करून त्यांची प्रिंट काढून त्यावर संशोधन स्थळ प्रमुख व मार्गदर्शकाची स्वाक्षरी घेवून उपरोक्त नमूद कागदपत्रे संलग्न करून आचार्य पदवी कक्षात जमा करतील.

८) अपूर्ण आवेदन आपोआप रद्द होतील. याबाबतची नोंद विद्यार्थ्यांनी घ्यावी तसेच याबाबतची सुचना मार्गदर्शकानी व संशोधक स्थळप्रमुखांनी आप—आपल्या स्तरावर विद्यार्थ्यांना द्यावी. याबाबत कोणतेही प्राप्त आक्षेप विचारात घेतले जाणार नाही याबाबत सर्व संबधितांनी आप—आपल्या स्तरावर नोंद घ्यावी.

९) संशोधन स्थळात संशोधनाकरिता मान्यता देण्यात आलेल्या विषयाची, मान्य संख्येची व रिक्त असलेल्या जागांची माहितीची सत्यप्रत आचार्य पदवी कक्षाकडे त्वरित सादर करणे आवश्यक आहे.

ड) <u>कार्यालयासाठी सुचना</u> :

१) ऑनलाईन आवेदन भरल्यानंतर विद्यार्थ्यांकडून हार्डकापी प्राप्त झाल्यानंतर विषयनिहाय तक्ता तयार करून संशोधन व मान्यता समितीच्या सभेचे वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकाशित करणे आवश्यक आहे. वेळापत्रकानुसार संशोधन व मान्यता समितीची सभा आयोजित करून समितीसमोर सादर करण्यात आलेल्या आराखडयावर सादरीकरणासाठी विद्यार्थ्यांना बोलविण्याची सुचना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकाशित करून पुढील कार्यवाही करावी.

२) अपूर्ण आवेदनावर कोणत्याही प्रकारची पुढील कार्यवाही घेण्यात येणार नसून असे अपूर्ण आवेदन आपोआप रद्द समजण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३) मार्गदर्शकाची माहिती, त्यांच्याकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती तसेच मान्यताप्राप्त संशोधन स्थळाची माहिती विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. आचार्य पदवी करण्यास उत्सुक विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर भेट देवून वेळोवेळी विद्यापीठामार्फत निर्गमित होणा–या अधिसूचना , निर्देश इत्यादी बघावे. विद्यापीठाचा आचार्य पदवी कक्ष संकेतस्थळावर अद्यावत माहिती प्रदर्शित करेल. व्यक्तिगत स्तरावर शक्यतोवर आचार्य पदवी कक्षामार्फत माहिती प्राप्त न करता संकेतस्थळावर भेट देवून माहिती प्राप्त करावी.

४) संशोधन व मान्यता समितीचा निणर्य सभा झाल्याच्या ३ दिवसांत विद्यार्थ्यांना संकेतस्थळावर संबधित विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात यावा.

(डॉ. निरज खटी)
परीक्षा नियत्रंक
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
नागपूर.